
# भले भले हे साने गुरुजी



पु. पां. गोखले

# भले भले हे साने गुरुजी

पु. पां गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

Bhale Bhale He Sane Guruji
P. P. Gokhale

□

प्रकाशक
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

□

© सर्व हक्क सुरक्षित

□

प्रकाशन दिनांक
५ डिसेंबर १९९८

□

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११०३०

□

**मूल्य : पंधरा रुपये**

## भले भले हे साने गुरुजी!

*'जो परोपकार करीतचि गेला। पाहिजे तो ज्याला त्याला।' जो दुसऱ्यांना जवळ करीत जातो, तो सर्वांनाच हवाहवासा होतो. तसेच होते साने गुरुजी. 'भला रे भला बोलती, ते करावे।।' असे होते त्यांचे धोरण; तर लोकांचे, समाजाचे, देशाचे ज्यात भले आहे, ते करीत राहावयाचे असे होते साने गुरुजींचे मत. त्यांचे मन होते आकाशासारखे मोठे. समाजात वागतावावरताना वादळे येणार, टीकांच्या विजा कडाडणार, निंदा धुळवडीसारखी होणार; पण मनाचा तोल न सोडता, आकाशासारखे उंचच उंच मन राखावे, आणि आपले कर्तव्य करीत राहावे, अशी आहे शिकवण साने गुरुजींची. त्यांच्या या गोष्टी वाचा की तोच ठसा उमटेल.*

**– पु. पां. गोखले**

**पु. पां. उर्फ बाबुराव गोखले**
**यांची बालवाङ्‌मय सेवा**

❖

गणपती बाप्पा

जय बजरंग

समर्थ रामदास

स्वामी रामतीर्थ

लो. टिळक

गोखल्यांच्या गोष्टी

भले भले साने गुरूजी!

बंडवाले नानासाहेब

सत्याग्रही गांधीजी

असे आपले आगरकर

❖

**समाजभूषण बाबुराव गोखले**
**स्मारक समिती**
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

# साने गुरुजी

पांडुरंग सदाशिव साने (१८९९ ते १९५०) ही त्यागमूर्ती. या राष्ट्रसेवकाने देशाच्या स्वातंत्र्याकरिता आणि सामाजिक, आर्थिक समतेकरता कष्ट केले, हाल सोसले आणि वाङ्मय लिहिले. सेवापरायणता आणि निरहंकार साधुवृत्ती हे गुरुजींचे विशेष. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यात पालगड येथे झाला. गरिबीला तोंड देत देत ते एम. ए. झाले. त्यांचे वाचन दांडगे; मनन सोज्वळ; आपली विद्या लोकांकारणी लागावी ही कळकळ.


अमळनेरच्या प्रशालेत १९२४ ते १९३० ते शिक्षक होते. १९३० पासून राजकीय चळवळीत देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी भाग घेतला. अनेकदा तुरुंगवास भोगला आणि तेथील कष्ट व हालही सोसले, पण आपली शिक्षणाची चाल चालूच ठेवली. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत ते भूमिगत झाले. अनेक बाळाजी चिटणिसांना त्यांनी साहाय्य केले नि अनेकांच्याबरोबर शिव्या-शापांचे तोबरेही खाल्ले! चळवळ संपल्यावर साने गुरुजी मजुरांच्या सेवेला लागले. अस्पृश्यतानिवारणाचेही व्रत त्यांनी घेतले आणि पंढरपूरचे विठोबाचे देऊळ त्यानी हरिजनांसाठी मोकळे करविले.

'श्यामची आई'सारखी कादंबरी त्यांनी लिहिली. ती समाजाच्या हृदयाला जाऊन भिडली; त्यांनी गोळा केलेली स्त्री-गीते हा समाजाचा ठेवा आहे. लहान मुलांसाठी त्यांनी गोष्टींची पुस्तके लिहिली आणि चरित्रे सांगितली आणि राष्ट्रपुरुषांच्या भक्तिपर कविता केल्या.

'साधना' साप्ताहिक काढून त्यांनी नव्या पिढीचे मन स्वतंत्र भारताच्या तेजस्वी बांधणीसाठी जागरूकपणे सावध ठेवण्याची दक्षता घेतली.

आपल्याला हवी तशी समाजाची घडी बसत नाही, असे त्यांना शेवटी आढळले! शीलवंत, सतेज आणि सहकारी वृत्तीचे राष्ट्र, सानेगुरुजींना हवे होते. ते करण्याची ताकद पैदा करण्याकरता, आपले थकलेले शरीर त्यागून साने गुरुजी अनंतात आपणहून मिळाले!!!

# १. आईची आज्ञा



ज्येष्ठाचा महिना. वडाची पौर्णिमा, वटसावित्रीचे व्रत म्हणजे तीन दिवसांचा उपास. तो आई करी. एकशे आठ प्रदक्षिणा वडाला घाली, पण एका वर्षी तिला उपास निभेना. आठ वर्षांच्या पांडुरंगाला आई म्हणाली– "पांडुरंगा, माझ्यासाठी घालतोस प्रदक्षिणा वडाला? कर रे एवढे माझे काम. करच."

पांडुरंग साने लगेच उठला अन् लागला वडाभोवती गरगर चालायला. पुरुषासारखा पुरुष पांडुरंग! तो बायकांत वडाभोवती घिरट्या मारू लागल्यावर, पूजेला जमलेल्या साळकाया माळकाया लागल्या फिदीफिदी हसायला! "बायकांत पुरुष लांबडा" असेही कुणी म्हणाले. पण म्हणेनात कुणी काय वाटेल ते. आईचे ऐकायचे एवढेच मुंज झालेल्या पांडुरंगाला माहीत.

□□

## २. सर्वांभूती सहानुभूती

घराचे अंगण; अंगणात बेहेळ्याचे झाड. उंचच उंच. त्यावरून काही तरी पडले. टप्कन आवाज झाला. पांडुरंग इकडे-तिकडे चोहीकडे पाहू लागला. त्याच्या नजरेला आले, एक चिमणीचे पिलू! लोळागोळा झाला होता त्याचा! केवढ्या उंचीवरून पडले होते ते! पंखदेखील फुटले नव्हते त्याला; डोळे उघडता येत नव्हते! फक्त पोट हलत होते; लोहाराचा भाता जणू! पांडुरंग कळवळला. त्याने कापूस आणला, त्या पिलाला त्यात ठेवले, त्याच्या चोचीत थेंब थेंब पाणी घातले. पण 'होणारे न चुकेल होईल जरी ब्रह्मा तया आडवा!' त्या पिलाची आई त्याभोवती घिरट्या घालीत होती. तरीही ते देवाघरी गेले.

पिलाची आई अन् पांडुरंग, दोघांनीही आसवे गाळली. पुढे आलेले कर्तव्य केलेच पाहिजे, म्हणून पांडुरंगने एक खड्डा खणला; त्यात त्या पिलाला अलगद ठेवले; "लोटितो तुझ्यावर माती!" असे म्हणत डोळ्यांतल्या पाण्याने त्या पिलाला पाणी दिले. पांडुरंग घरात आला. त्याला चैनच पडेना. तीन दिवस त्याने सुतक पाळले त्या चिमण्या पक्ष्याचे. 'भूतमात्राचे ठायी। आप-पर नेणेच काही।।' असा झाला पांडुरंग.

□□

## ३. कुडबुड्या का इंद्र होता?

पांडुरंग एकदा मामाकडे मुंबईस होता. त्याने मंडई केली. तेथे त्याला भेटला एका कुडमुड्या जोशी. "बाबाचे नाव व्हईल!" म्हणून त्याने भविष्य सांगितले. पांडुरंग गालांतल्या गालांत हसला. कुडमुड्याला वाटले, पंढरीचा पांडुरंगच प्रसन्न झाला. त्याने पांडुरंगाला कोट व जोडा मागितला. नवकोट नारायणाच्या दिलदारीने दोन्ही वस्तू पांडुरंगाने त्याला दिल्या. घरी आल्यावर हे कळले. "नेसूचेसुद्धा द्यायचास बाबा!" अशी कुणी तरी चेष्टा केली. पांडुरंगाने सांगितले की, "कर्णाने नव्हती का कवचकुंडले दिली भिकारी होऊन आलेल्या इंद्राला?"

कुडमुड्या का इंद्र होता!

□□

## ४. खाऊतून कोट

पालगडचा पांडुरंग. गावी शाळा नाही, म्हणून दापोलीला शाळेला राहिला. खटल्याखेकट्याची कामे तालुक्याचेच गावी चालतात. तेव्हा पांडुरंगाचे वडील सदाशिवराव वरचेवर तेथे येत. आले की परत जाताना 'खाऊ' म्हणून मुलाला दोन आणे देत. पांडुरंगाने त्यांचा कुणगा केला. त्याचा गल्ला एक रुपया दोन आणे झाला. आता गणेश चतुर्थी जवळ आली होती. पांडुरंगाने त्याचा एक कोट शिवून आणला. आपल्यासाठी? छे, छे! धाकट्या भावासाठी.

गौरी-गणपतीला पांडुरंग पालगडला आला. आणलेला कोट त्याने भावाला दिला. तो घालून भाऊ नावाप्रमाणे पुरुषोत्तम दिसू लागाला. तेव्हा वडील म्हणाले, "कुठले रे पैसे?" आई अधिकच घाबरली. तिने विचारले, "कुणाच्या खिशात हात नाही ना घातलास?"

"तसे काही नाही!" पांडुरंग उत्तरला. "बाबांनी दिलेले खाऊचे पैसे साठवले अन् त्यातून हा कोट शिवून आणला!"

"अस्से का? तरी मला वाटलेच. माझा पांडुरंग! तू नुसता वयाने मोठा नाहीस, पैशाने मोठा नाहीस, मनानेच मोठा आहेस. असाऽऽच मोठा, मोठा, मोठा हो बरे!"

□□

## ५. नवसामागील वसा

पालगडला सुटीत आला पांडुरंग. आईचे सांधे दुखत होते. पांडुरंगाने चौकशी केली. आई म्हणाली, "संधिवात बरा व्हावा म्हणून मी लाडघरच्या देवाला नवस केला आहे. तो फेडायचा आहे. आपण जाऊ उद्या सकाळी!" पांडुरंगाने होकार दिला.

पहाटेचा कोंबडा आरवला. गाडीवान वेळेवर आला. मायलेकरे गाडीत बसली. पहाटेची शांत वेळ. पांडुरंगाचे डोके मांडीवर थोपटत आई म्हणाली, "घनदाट या रानात। धो धो स्वच्छ वाहे पाणी। माझ्या



श्यामच्या जीवनी। देव राहो।।" तसा पांडुरंग बसला की उठून. आईने विचारले, "का रे?"

"तू देवाला बोलावतेस ना? मग मी झोपू? आळशावरून गंगा जाईल की!"

तशातच आले लाडघर! मायलेकरे समुद्रावर केली. लंगोटी लावून पांडुरंग समुद्रात उतरला. आई गुडघ्या-मांड्याइतक्या पाण्यात आंघोळ करू लागली. तीर्थेच तीर्थे समुद्रात असतात. (समुद्रे सर्व तीर्थाणि।) म्हणून थेंब थेंब पाणी दोघांनीही तोंडात घेतले. आईने हळदीकुंकू वाहून जलदेवतेची पूजा केली; चार आण्याचे नाणे ओवाळून समुद्रात टाकले. ही सारी कृतज्ञतेची पूजा होती.

दुपारी चार वाजता, टेकडीच्या देवीला दोघे गेली. करंडा, बांगड्या आईने देवीला वाहिल्या. खणानारळाने ओटी भरली. आपल्या, पांडुरंगाच्या अन् साऱ्यांच्या कपाळाला देवीचा अंगारा लावला. 'आजि पुरला नवस। धन्य काळ हा दिवस।।' अशा आनंदाने मायलेकरे पालगडला परतली. अगदी मनातल्या मनात देखील बोललेला शब्द खरा करून! स्वप्नात

शब्द देऊन तो खरा करणारा हरिश्चंद्र! त्याचा वसा चालवतात नवस फेडणारी माणसे!

□□

## ६. आईविना झालो तर!!

पाटल्यापरी पाटल्या गेल्या! घर असावे म्हणून ते बांधण्यासाठी पांडुरंगाच्या वडिलांना पांडुरंगाच्या आईने त्या उतरून दिल्या होत्या; पण त्यांच्या भरीला पांडुरंगाच्या वडिलांनी– सदाशिवरावांनी– थोडेसे कर्ज काढले होते, पण ते फिटले नाही; व्याजावारी ते वाढतच गेले. अन् एक दिवस सावकाराने येऊन घर जप्त केले! झाले, आईचा हातचा सोन्याचा डाग गेला अन् गाडीभर बेअब्रूचा डाग आला, याचे फार दुःख झाले. ती खंगलीच! अंथरूण धरले तिने. तिचा दमा वाढला, सांधे धरले, ती 'पांडुरंग, पांडुरंग' करू, लागली! पण छे! "त्याला बोलवायचा नाही हो, पोराचा अभ्यास बुडेल." असे बजावीत होती. तिने आपली बहीण सखूताई हिला बोलावून घेतली.

पण 'आले देवाजीच्या मना। तिथे कोणाचे चालेना।।' पांडुरंगाच्या सखूमावशीने रात्रंदिवस शुश्रूषा केली तरी पांडुरंगाच्या आईने एक दिवस 'राऽऽमऽ' म्हटले.

त्या आईच्या मरणदिवसाच्या आदल्या रात्रीच पांडुरंगाला स्वप्न पडले होते. आई खूपच आजारी असल्याचे ते स्वप्न होते. "स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी।।" असे जर आहे, तर आपले ते दैवत देवाघरी जाणार का? या एका शंकेनेच पांडुरंग व्याकुळला. काकुळतीने पैसे उसने काढून तो आईच्या भेटीसाठी कोकणाकडे धावला.

हर्णै बंदर आले. त्याला मावशी दिसली. तिनेही पांडुरंगाला पाहिले. मावशीच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहिल्या. पांडुरंगाने विचारले, "मावशी तू कुठे निघालीस? आई घरी आहे ना?"

मावशी काय बोलणार? सखूमावशीला नोकरीवर जायची गडबड होती. ती एवढेच म्हणाली, "अक्काचे सोने झाले!" पांडुरंग समजला. त्याला भडभडून आले. बैलगाडीचे आणि आठवणींचे हिसके, हेलकावे

नि धक्के सोसत सोसत तो घरी गेला. वडील तरटावर बसले होते. खोलीमध्ये एक पणती शांतपणे जळत होती. आईच्या त्या प्रतिनिधीला पांडुरंगाने नमस्कार घातला. दुसरे दिवशी कापऱ्या शरीराने, थरथरणाऱ्या हृदयाने अन् हेलावणाऱ्या मनाने पांडुरंग स्मशानात गेला. काय पाहिले त्याने? आईची निजलेली भस्ममय मूर्ती! शंकराच्या अंगावरील भस्माचे रूप धारण केलेल्या त्या आईच्या पायांवर पांडुरंगाने डोके ठेवले. अन् आपल्या आसवांचा तिच्या पायांवर अभिषेक केला! ती भस्माची मूर्ती मग भंगली. पांडुरंग चरकला. 'आता आपल्याला कुठे आहे आई? आपण आता मातृभक्त कसे व्हायचे? आपण मोहात पडू नये म्हणून तर आई निघून नाही ना गेली?' भावप्रधान हृदयाची ती आशंका होती. पांडुरंग विचार करू लागला. तो मनाला म्हणाला, 'परमेश्वरासारखीच माझी आई आता सगळीकडेच असणार. तिची पूजा करायची, तर तिचे ते प्रेम, ती कृतज्ञता, ती कर्तव्यबुद्धी, ती सोशिकता, ती मधुरता मी आचरणात आणून तिला शोभेसा मुलगा होईन. उत्तम अनुकरण हीच उत्तम पूजा असते. ती मी आईची करीनच, पण ती करता करता माझ्या मोठ्या आईची, भारतमातेची सेवा करीन.'

□□

## ७. साने सर ते साने सर

आई गेली, म्हणून पांडुरंग कपाळावर हात मारत बसला नाही. तो आला फिरून शाळेत. १९१८ साली मॅट्रिक झाला आणि गेला न्यू पूना (सर परशुरामभाऊ) कॉलेजमध्ये. त्याच्या हुशारीने महामहोपाध्याय पोतदारप्रभृती एवढे खूष होते की "सान्यामुळे माझ्या 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार'हा ग्रंथ तयार झाला," असे पोतदारांनी नमूद करून ठेवले आहे. मग पांडुरंग १९२४ साली एम. ए. झाला. अमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिरात 'फेलो' म्हणून त्याने काम केले. पुढे तो अमळनेर हायस्कूलमध्ये शिक्षक झाला.

समोर बसलेली बाळे शिबी-श्रियाळ, शिवाजी-प्रताप तो मानी. त्यांना ज्ञानी, प्रतापी व कर्मवीर करण्याची जबाबदारी शिक्षकावर आहे.

त्याशिवाय का शाळांतून राष्ट्राची रचना होणार? म्हणून देव होऊन देवाला जिंकायचे पांडुरंगाने ठरविले. सहावीला कवी दत्तांचे 'अंगाई गीत' त्याने शिकवले. अन् करुणरसात, वात्सल्यात, माणुसकीच्या गहिवरात मुले इतकी गुंग झाली की, तास केव्हा संपला हे त्यांना कळलेही नाही. मधली सुटी झाल्यावर जो तो विद्यार्थी म्हणू लागला, "साने सर ते साने सर. त्यांची सर कुणाला येणार?"

□□

## ८. सेवकाची सेवा

अमळनेरच्या प्रशालेचे छात्रालय. त्याची व्यवस्था पांडुरंग साने सरांच्याकडे. मग काय? जुने गुरुकुलच झाले ते. एके दिवशी दहा वाजता साने सर जेवायला बसले. सहज बोलता बोलता त्यांनी विचारले, "अलीकडे गोपाळा गडी कुठे दिसत नाही तो?"

"सर, तो आजारी आहे." उत्तर आले.

कसचे काय अन् कसचे काय? अन्न हे पूर्णब्रह्म असे शिकवणारे सानेसर अन्नावरून उठले. तडक गेले. त्याची प्रकृती त्यांनी पाहिली. ते बेचैन झाले. ते गोपाळाला म्हणाले, "मी शाळेत जातो आता. पण संध्याकाळी माझ्या खोलीत नेतो हं! अरे, तू माझा धाकटा भाऊच!"

शाळा सुटली. अधीरपणे सान्यांनी गोपाळाला आपल्या खोलीत नेले. साने त्याची सेवा करू लागले. पांडुरंगाची प्रसन्नता ती. छात्रालयातील विद्यार्थीही मग गोपाळाच्या उशापायथ्याशी बसू लागले. 'अनंतहस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने?॥' डॉ. म्हसक आले. त्यांनी विषमज्वराचे निदान केले. साने नि त्यांचे विद्यार्थी म्हणाले, "आम्ही त्याची सेवा करू, त्याला मोसंबी देऊ, डॉक्टर, सारी फी आम्ही भागवू. पण गोपाळाला बरा करा, बरं!"

गोपाळाच्या विष्ठेची घाण सहन करण्यासारखी नसे. ती साफ करीत.

ही बातमी बाहेर पसरली. एका पालकाने साने यांना लिहिले, "आपण ज्याची सेवा करता त्याच्या औषधाचे सारे पैसे मी देईन."

एकविसावा दिवस उगवला. डॉक्टरांनी गोपाळला तपासला. त्यांचा

चेहरा खर्रकन उतरला. गोपाळाचे डोळे थिजत होते. थोडा वेळ गेला अन् गोपाळही!!

गोपाळांच्या शरीराची यात्रा मग चार पदवीधरांच्या खांद्यावरून झाली. गुरुजींनी त्याच्या मुलाचे काम केले. गोपाळाचे शरीर भस्म होऊन गेले. स्मशानातून साने नि इतर मंडळी परतली. विद्यार्थी अन् लोक म्हणू लागले, "गोपाळची सेवा साने सरांनी केली, ते पाहिले, मग श्रीखंड्या होऊन एकनाथांच्या घरी देवाने सेवा केली हे खोटे कसे मानावे!"

□□

## ९. साधा शिक्षक? छे हो, लोकशिक्षक!

अमळनेरच्या प्रशालेत सहाच वर्षे साने सर शिकवीत होते, पण क्रमिकांच्या झरोक्यातून शिकणारांना आजचे व उद्याचे जग दाखवून! "महाराचे पोर प्रेमाने कुरवाळून खांद्यावर घेणारा एकनाथ; 'बोले थोडे करी फार' असा वैदिक धर्माची बाजी राखून सगळ्या भारताचा अभिमान ठरलेला शिवाजी; मस्तानीपासून झाला असला तरी समशेर बहाद्दराची मुंज झाली पाहिजे असे म्हणणारा (पहिला) बाजीराव! जिवावर उदार होऊन पोर्तुगीजांपासून वसईचा किल्ला घेणारा आणि कसल्याही मानमरातबाची अपेक्षा न करणारा चिमाजीअप्पा, बालविधवेचा पुनर्विवाह व्हावा असे सांगणारा आणि राज्यकारभार करणारांनी प्रजेचे हित हीच स्नानसंध्या मानली पाहिजे हे प्रबोधन करणारा रामशास्त्री; मुलांचा हुंडा घेणारा बाप नष्ट-चांडाळ-पापी होय असे प्रतिपादणारा कविवर्य मोरोपंत; 'हे विश्वचि माझे घर। ऐशी मति जयाची स्थिर।' तो ज्ञानेश्वर; ही नि अशी माणसे म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास; हेच महाराष्ट्रधर्माचे शिल्पकार. अंतर्बाह्य स्वातंत्र्य हे मराठी संस्कृतीचे सार. महाराष्ट्रधर्म जिकडे तिकडे पसरावा म्हणून महाराष्ट्राचे समर्थ संत सांगत आले आहेत. 'अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।' ही आमच्या तुकाराममाची प्रतिज्ञा. सर्वोदय हेच महाराष्ट्रधर्माचे ध्येय. महाराष्ट्राने आपल्या कृष्णा-गोदावरीसारख्या नद्यांचे पाणी पार आंध्रापर्यंत पोचविले आहे. याच व्यापक जिव्हाळ्याने आपल्याला भारताचा इतिहास नव्याने निर्माण

करायचा आहे.'' असे साने सरांच्या शिकवणीचे सार.

एवढ्यात १९२९ च्या शेवटच्या दिवशी रावी नदीच्या काठी पं. जवाहरलाल नेहरूंनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय घोषित केले. १९३० साली म. गांधींनी दांडी-मोर्चा सुरू केला. सरकारी जबरदस्तीला गुंडाळून ठेवून गांधींनी मीठ तयार केले. गांधी म्हणाले, ''हे नुसते मीठ नाही. भारताच्या मिठाला जागून स्वाभिमान आणि निर्भयता मी साकार करीत आहे.''

छे! साने गुरुजींनी आता कसे प्रशालेच्या आवारात स्वस्थ राहावे? त्यांचे हृदय १९३० च्या प्रारंभापासूनच उचंबळले होते. ते म्हणत– ''उचंबळे का अपार सागर सीमा सोडुनि आज अहो। स्वर्गातुनि सुमनवृष्टि होतसे अपार का मज सांगा हो।। नारदतुंबर गाणी गाती सुरमुनि हर्षित ते का हो। कैलासावर डमरु वाजतो, नाचे शिवशंकर का हो।। चार मुखांनी चतुरानन का सामगायना करतो हो।। भारत स्वतंत्र हो का! जय बोला जय बोला हो।।''

म्हणून १९३० साली साने प्रशालेच्या अन् नोकरदारीच्या आवारातून बाहेर पडले, आणि हिंडले सगळ्या खानदेशभर. खेडोपाडी त्यांनी स्वातंत्र्याचा संदेश पोचविला. त्या स्वातंत्र्यासाठी तानाजी-बाजीप्रभू-महादजी (शिंदे) यांच्यासारखे त्यांनी रान उठवले.

कसे खपावे ते परसत्तेला! तिने पांडुरंग सदाशिव सानेला पकडले अन् केले धुळे येथे बंदीवासी!

तेथे का हा लोकशिक्षक गप्प बसणार! जनाबाईला दळताना प्रत्यक्ष पांडुरंग हात देत असे. तसेच हा पांडुरंगही सहकैद्यांना हात देई. एवढेच नाही, तर तो त्यांना 'गोड गोष्टी' सांगू लागला. 'जो परोपकार करीतच गेला। पाहिजे तो ज्याला त्याला।।' त्यामुळे हा 'पांडुरंग ध्यानी, पांडुरंग मनी।' ज्याच्या त्याच्या मनात राहिला.

छे! छे!! आता तर परकीय सत्ता अधिकच खवळली. तिने या लहानशा मूर्तीला उचलले अन् त्रिचनापल्लीच्या तुरुंगात नेऊन टाकले. का? तर तिथे मराठीच नाही! तामीळ, तेलगू, मल्याळी, कानडी बोलणारे सारे. ''आता कसा साने देशभक्तीची धरणे बांधतोय पाहू!'' अशी होती परसत्तेची घमेंड.

पण करायला जावे एक अन् व्हावे भलतेच, असे परसत्तेला होऊन गेले. तेथे पांडुरंगाला प्रचीती आली की वैचित्र्य, विविधता आहे, पण त्यातही संस्कृती एकच आहे. 'एकोऽहं बहु स्याम्' या वेदवचनाचा साक्षात्कार पांडुरंगाला झाला. ते एकत्व जागे व जागरूक राखण्याची युक्ती त्याला सुचली. 'आंतरभारतीची' भाषा सान्यांनी सुरू केली. ते लोकधर्मशिक्षक होऊ लागले.

अमळनेरच्या प्रशालेला सान्यांनी एक पत्र लिहिले : "आपल्या शाळेत एक बंगाली मित्र आहेतच. त्रिचनापल्लीच्या तुरुंगातून माझे मित्र श्री. व्यंकटाचलम् सुटत आहेत; ते बी. एस्सी. आहेत; त्यांना तामीळ, तेलगू, मल्याळी भाषा येतात. त्यांना आपल्या शाळेत घ्या. हे दक्षिणेकडील एक मित्र होतील. त्यायोगे आपली शाळा भारतीय ऐक्याचे प्रतीक होवो. भारतातील सर्व प्रांतांतील शिक्षक तेथे असोत. तेथे मग सगळ्या प्रांतांची भाषा ऐकू येईल; संस्कृति-वाङ्मय कळेल आणि सर्वांचे एकजिनसी भारतीयत्व वाढीला लागेल. भारत हे एक राष्ट्र आहे. पूजेच्या वेळी कलशाची पूजा करताना 'गंगे च यमुने चैव गोदावरि, सरस्वति, नर्मदे, सिंधु, कावेरी, जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु।।' अशी आपली प्रार्थना असते. बारीकसारीक गोष्टींतसुद्धा आपण सारा हिंदुस्थान पाहत आलो आहोत."

□□

## १०. साने गुरुजी

१९३१ मध्ये गांधी-आयर्विन करार झाला. महात्माजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला लंडनला येथे गेले. त्या कराराप्रमाणे १९३० च्या चळवळीतील सारे बंदी सुटले होते. त्यात साने सरही, पण सुटल्यावर ते का गप्प बसणारे होते? हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेपर्यंत काँग्रेसचा प्रचार खेडोपाडी केला पाहिजे म्हणून ते तोच उद्योग करीत होते. लोक जागे होत होते व नव्या लढ्याला तयार होत होते.

इकडे लंडनची गोलमेज परिषद संपली. महात्माजी १९३२ च्या ४ जानेवारीला मुंबईस परत आले. तोच त्यांना आणि भारतातील देशभक्तांना ब्रिटिश सरकारने पुन्हा तुरुंगात घातले. कारण गोलमेज



परिषदेत गांधी म्हणजेच काँग्रेस असे ब्रिटिश सरकारला वाटले होते; तसे घडले नाही. पांडुरंग सदाशिव साने हे काँग्रेसचे खानदेशी प्रचारक. तेही मग पकडले गेले. धुळे येथील तुरुंगात त्यांना ठेवले होते. तेथे येवले येथील राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थीही बंदी होऊन आले. त्यांची व साने यांची भेट झाली. ते सान्यांना म्हणाले, "गुरुजी, आम्हांला गोष्ट सांगा." येवल्याच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षकांना गुरुजी म्हणत असत. साने रोज गोड गोड गोष्टी सांगू लागले. येवल्याचे विद्यार्थी व इतरही राजबंदी नि शिपाई व वॉर्डनही गोष्टी ऐकू लागले. त्या गोडव्यातूनच साने सगळ्यांचे 'साने-गुरुजी' झाले.

धुळे-बंदीखान्यात त्या काळी संत विनोबा भावे होते. त्यांची गीतेवर प्रवचने होत. त्यांची अचूक टिपणे साने गुरुजींनी केली. त्या टिपणांतून 'गीताहृदय' हा ग्रंथ निर्माण झाला. शिकावे कसे अन् शिकवावे कसे, याचा आचारपाठच साने यांनी सगळ्यांच्या पुढे ठेवला. सहजच 'साने गुरुजी' ही त्यांची लोकपदवी अमर झाली. विद्या विनयेन शोभते। साने विनोबाजींपुढे मान खाली घालून हात जोडून असत, पण समजावून

घेण्यात व समजावून देण्यातही अग्रेसर असत. त्यामुळेच ते 'गुरू म्हणजे थोर' ठरले.

□□

## ११. अपमानशल्य ते विषसमचि जीवना!

साने गुरुजींना नाशिकच्या तुरुंगात नेले. तिथे होता औरंगजेबी अंमल. तेथील जेलर रोचाचा खाक्याही तसाच होता. पहिल्याच भेटीत साने गुरुजी त्याला विनयाने म्हणाले, "मी नवीन आहे. मला इथले नियम समजवा. आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू!"

त्या अँग्लो इंडियनाचा चढला की पारा वर! "खटलेपे लाओ" असा हुकूम झाला. साने गुरुजींना सुपरिंटेंडेंटपुढे उभे करण्यात आले. एकदम निकालच! खटला चाललाच नाही! 'दंडबेडी'ची शिक्षा गुरुजींना झाली. ते अलंकार घालून गुरुजींच्या घोट्यांतून आणि मनगटांतून रक्त चिळकांडू लागले. गुरुजींना कळेना, आपला अपराध तरी काय घडला!!

त्यांना जेलखान्याच्या एका वॉर्डात ठेवले. तेथे त्यांना महात्मा गांधींचे सहकारी स्वामी आनंद भेटले. त्यांनी गुरुजींचे स्वागत केले. गुरुजींनी स्वामींना घडलेले सारे सांगितले. "माझे काय चुकले?" असेही विचारले.

आनंदस्वामी काय सांगणार? त्यांनी फक्त दिलासा दिला. गुरुजींच्या घोट्यावर बांधण्यासाठी जेलरकडे चिंध्या मागितल्या तर स्वामींना निरोप आला की, "झाडाचा-पाला बांधा." तसे करावयास जेलच्या त्या भागात झाड होतेच कोठे? शपथेला तरी?

तशातच एक सायंकाळ आली! सत्याग्रही उभे होते. वॉर्डर म्हणजे कैदीमंडळीतून झालेला पोलिसाखालचा पहारेकरी कैदीच! पण तो गरजून बोलला, "पायांवर हात ठेवा. मान गुडघ्यात घाला. उकिडवे बसा. आपल्या अनुक्रमाचा आकडा मोठ्याने सांगा."

सत्याग्रही का अशाला बधणार? ते ताठ उभे होते. मग एकेकाला शिक्षा होऊ लागल्या. साने गुरुजींची पाळी आली. ते ताठ मानेने उभे होते. दिसायला बावळा अन् डोळ्याला डोळा भिडवतो! रोचसाहेबांचा

आवाज घुमला. गुरुजींच्या डोक्यावर दंडुके बसू लागले. गुरुजींची मान 'मोडेन पण वाकणार नाही', अशी ग्वाही देत होती. गुरुजींना चक्की पिसण्याची म्हणजे दळण दळण्याची शिक्षा झाली! त्यांच्या अंगावर गोणपाट चढविण्यात आले. तरीही साने बेडर. बाकीचे कैदी 'हा कोण धैर्यधर?' या कुतूहलाने पाहत. अंगावर गोणपाट, हातापायांत बेड्या अन् चक्की पिसण्याचे काम! सारा नरकासुराचा दरबार!! तरीही गुरुजींचे 'धिक्कार मन साहिना!' मऊ मेणाहुनि असलेला हा देशदास। कठीण वज्रास भेदू ऐसा झाला. तो म्हणे :

"खळखळू द्या या अदय शृंखला हातापायांत। पोलादाची काय तमा या मरणाच्या दारात।। सर्पांनो, उद्दाम आवळा कसूनिया पाश। पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश।।"

प्रल्हादाच्या कसोटीचा पांडुरंग, सानेगुरुजी ठरला! जनताजनार्दन जागा झाला. सरकाराची कानपिचकी बाहेरच्या बाहेर झाली. कायदेशीर तपास सुरू झाला. अन्? चमत्कार घडला. साने गुरुजी सुटले, तुरुंगाबाहेर आले, आणि त्यांच्यावर दात धरणारा रोच जेलर कैदी होऊन पडला.

□□

## १२. आईसारखे व्हावे

पुणे येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटी भरली. तेथे १९३४ मध्ये ठराव पास झाला की संसदीय कामे करावीत. साने गुरुजींना त्यात रस नव्हता. ते सत्याचे भक्त अन् सेवायोगी. त्यांनी अज्ञातवास पत्करला. भारतीय स्त्री-जीवनाच्या ओव्या ते टिपू लागले. इतिहास परंपरेचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडवावयाचा ना? मग, उद्याची कन्या, पत्नी, माता भारतीय परंपरेतूनच वाढली-विकासली पाहिजे. या नव्या देवतांना जुनी वळणे-वाकणे माहिती व्हावीत, हा होता रोख ओव्या गोळा करण्यात गुरुजींचा. बायका लाजत, गुरुजींना हसत, काही वेळा गहिवरत; पण गुरुजींची चिकाटी दांडगी. भारतीय मायजातीचा सेवायोग ते साधीत होते. आपली वहिनी मरणाला टेकलेली! गुरुजींना ते दिसत होते. तरीही ओवीचे जुने ठेवणे गुरुजींनी त्यांच्याकडून घेतलेच. ते हे :

"पालगड गावाचा।। टाकी लावुन रस्ता फोडा।। रंगीत गाडी धाडा।। भाईरायाला।।"

वहिनींचा हा प्रसाद मिळताच गुरुजी कृतज्ञतेने शहारले. अशा वत्सल हृदयाने वागण्याचा त्यांनी निश्चय केला.

ते पुण्यास पेरूगेटज़वळ राहत. अमळनेरचे काही विद्यार्थी कॉलेज शिकायला पुण्यास होते. ते कॉलेजला गेले की गुरुजी त्यांची चूल पुजायचे. जेवण तयार करण्यात त्या मुलांचा वेळ कशाला घालवायचा! तेवढाच त्या मुलांना अभ्यास करायला अधिक वेळ मिळेल! ही गुरुजींची भावना. वडील माणसांनी आपला फुरसतीचा वत्सल मनाने आईसारखा कामाला लावावा, हा गुरुजींचा कटाक्ष.

□□

## १३. फैजपूर झाले फत्तेपूर

भारतातील लोकशाही ही खेडुतांची लोकशाही व्हावयाची; कारण भारत हा खेड्यांचा देश आहे. म्हणून खेड्याखेड्यांचे लोक राजकारणात व्यवहारशुद्ध व शहाणे झाले पाहिजेत हे उघड आहे. लोकशाही स्वराज्यासाठी खटपट करणाऱ्या काँग्रेसचे अधिवेशन मग खेड्याखेड्यांत का भरवू नये? असा विचार महात्माजी अनेक वर्षे करीत होते. त्यांचा विचार साकार करण्याचे महाराष्ट्राने मनावर घेतले. खानदेशातील फैजपूर या खेड्याची निवड झाली. १९३६ मध्ये भरावयाची ती काँग्रेस! छे, शहरी रुबाबाला रुळलेली पन्नास वर्षांची काँग्रेस खेडेगावात कशी यशस्वी होणार? अशी भीती वाटून नवे-जुने वहिवाटदार म्हणत, "अटकेपार झेंडे लावायला निघालेला महाराष्ट्र फैजपूरला फजीतपूर बनविणार?"

महाराष्ट्र म्हणाला 'करा चेष्टा! टवाळीला आलेले आमच्याबरोबर भूपाळीला बसवू तरच लोकमान्यांचे महाराष्ट्रीय म्हणवून घेऊ!' अन् काय? शंकरराव देवांपासून सारे लागले जिद्दीने कामाला. साने गुरुजी खानदेशाचा जीव की प्राण. त्यांनी खेड्यातील काँग्रेसच्या कल्पनेचे कल्पनातीत स्वागत केले, अन् सेवाव्रताने ते नि एस. एम. जोशी

काँग्रेसचे तिरंगी निशाण घेऊन लागले प्रचाराला. पायावर भिंगरी पडली होती गुरुजींच्या. खेडे नि खेडे टिपले त्यांनी. काँग्रेसचे तत्त्वज्ञान अन् महत्त्व त्यांनी पटवून दिले. मग काय हो! ''अनंत हस्ते जनता वराने। देता किती घेशिल दो कराने?' असे होऊन गेले काँग्रेसला. फैजपूरला काँग्रेसनगरी थाटली गेली. सगळ्यांची सारी सोय अन् सेवा होईल अशी व्यवस्था झाली. साने गुरुजी कोणत्या पदी होते तेथे? त्यांचे नाव पांडुरंग ना? त्यांचा सेवाभाव सारा काँग्रेससाठीच ना? काँग्रेस त्यांच्या जिद्दीचा एक-नाथ होता ना? मग गुरुजी कोठे असणार? आपले भारतमाता-सेवेकरी. पुंडलिकासारखे स्वयंसेवक घेऊन ''श्रीएक-नाथ-भजनी साने गुरुजीच सर्व हे करितो। स्वकरे झाडू मारी, गरजूची शुश्रूषाहि सावरितो।।'' असा अनुभव आला. पं. जवाहरलाल नेहरू हे अध्यक्ष अन् शंकरराव देव स्वागताध्यक्ष असलेले हे काँग्रेसचे अधिवेशन खेड्यात होऊनही एवढे यशस्वी झाले की त्याच्या साधेपणाच्या थाटाची'' प्रशंसा तर झालीच, पण लोकनायक अणे म्हणाले की, ''फैजपूरचे आज फत्तेपूर'' झाले. आणि? ''आहे तरी सर्वांठायी पाहो जाता कोठेच नाही।।'' अशा साने गुरुजींच्या सेवाभावाचा पांडुरंग पुंडलिकाच्या मायभूसेवेवर बेहद्द खूष झाला.

□□

## १४. सौ. कमल कोपर्डेकर यांचा अनुभव

त्या सांगतात–

''गुरुजी आमच्या घरी नेहमी येत. गुरुजी आले असे पाहिले की, मला वाटायचे माझे मामा आले. लहानपणी त्यांना आलेले पाहताच मी पळून जात असे; अन् आता मोठेपणी गुरुजी आले म्हणताक्षणी मी एक दुधाचा पेला हातात घेऊनच त्यांच्या स्वागताला जाते. त्यांचा एक नियम मला ठाऊक की, ते दुधाला कधी नाही म्हणावयाचे नाहीत.''

चाळीस सालची गोष्ट. एक दिवस सकाळी गुरुजी आले व म्हणाले, ''वत्सला, मला फार वेळ झाला यायला– पण भूक फार लागली आहे.'' मी म्हटले, ''अण्णा, बसा ना; मी तुम्हांला आता वाढते.''

त्यांना बाजरीची भाकरी फार आवडायची. मी एका वाटीत दूध दिले व लगेच एक भाकरी तयार केली व म्हटले, "बसा ना; माझी भाकर निवेल."

"हा बघ बसतो, ऊन ऊन भाकरी मला फार आवडते. आपण पैज लावू या. तू भाकरी कर, मी खातो."

पुढे म्हणाले, "मी तुला एक गोष्ट सांगतो. एकदा कृष्ण द्रौपदीकडे जेवायला आला व द्रौपदीताईला म्हणाला, आज मी तुझी फजिती करणार आहे, बरं का! रोज तू माझी तुळशीच्या पानावर बोळवण करतेस, हे काही बरे नाही." द्रौपदी म्हणाली, "देवा बसा ना, पक्वान्न काय करू ते सांगा." कृष्ण म्हणाला, "मला फक्त बाजरीची भाकरी वाढ."

गुरुजी पुढे बोलू लागले, "गरिबांची भाजी-भाकर खाणारा कृष्ण कुणीकडे आणि आजचे आमचे मेजवानी झोडणारे सावकार कुणीकडे! मला फार राग येतो यांचा! यांना नुसता पैसा दिसतो. माणूस दिसत नाही. एक तामलेभर दूध घेतले की यांची चोरी होते; शेतातून चार काड्या घेतल्या की यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाते; अन् इकडे देशाला मोठी आग लागली आहे, ती यांना दिसत नाही."

अण्णा बोलायला लागले की त्यांना भान राहत नसे. मला मात्र भीती वाटायला लागली की आता उशीर होणार, नि यांची गाडी चुकणार! इतक्यात धाकटा हेम धावत आला अन् त्याने विचारले, "आई, आपण पण अण्णांच्या बरोबर जाऊ या का?" मी म्हटले, "बरे जाऊ या हं." तशी अण्णा भानावर आले. मला म्हणाले, "तुझ्याशी बोलण्याच्या नादात मला मात्र उशीर झाला." मी म्हटले, "नाही व्हायचा उशीर! पण एवढे दही घ्या हातावर, म्हणजे पुन्हा लवकर भेटीला याल."

□□

# १५. विनय आणि जिव्हाळा



डिसेंबर १९४०. गुरुजींना अटक झाली. नेले सरकारने त्यांना नाशिक-तुरुंगात. तेथे सेनापती बापट होते. डोकेदुखीमुळे दवाखान्यात पडून होते. साने गुरुजी त्यांना भेटावयाला गेले.

सेनापतींच्या पायी गुरुजींनी डोके ठेवले. सेनापती बापट लगेच उठून बसले. पांडुरंगाने पांडुरंगाला केलेला नमस्कार होता तो. सान्यांचा विनय आणि बापटांचा जिव्हाळा यांची ती हार्दिक भेट होती. ''आपल्या घरी आलात?'' सेनापतींनी विचारले.

''हो!'' गुरुजी उत्तरले.

''ब-वर्ग घ्या की मागून!''

''तात्या, आपण का हो नाही मागून घेत?''

''माझा वेळ क-वर्गीयांत सहज जातो. ब-वर्गीय होऊन माझा काय उपयोग? तुम्ही ब-वर्गात गेलात तर काही लिहाल तरी!''

''मला लिहायला स्फूर्ती मिळते क-वर्गीयांतूनच. त्यांच्यातच मी

वाढलेला. त्यांच्यासाठीच खरोखर लिहावयाचे ना? अन् आपला वेळ क-वर्गीयांत जातो, तसाच माझाही जातो. मी लिहितोही त्यांच्यात बसून. त्यांना वाचून दाखवले की तेही रमतात. मग मला ब-वर्ग काय करायचाय?''

येथे खुंटले बोलणे!

साने गुरुजी आपल्या नेमल्या कोठडीत गेले.

□□

## १६. साने झाले 'भूमिगत'

'चले जाव' ची चळवळ १९४२ साली सुरू झाली. इंग्रजांना तो आदेश काँग्रेसने दिला. पण त्यांनी तो मानला नाही तर? त्यांच्यावाचून आपले चालते, हे सिद्ध करण्याची जबाबदारी भारतीयांवर आली, ती पार पाडावयाची तर इंग्रजांनी इथून निघून जावे, इतका त्यांना वैताग निर्माण करावयाचा आणि दुसऱ्या बाजूने आपली आपण राजकीय सुव्यवस्था ठेवावयाची. लोकमान्यांच्या 'बहिष्कारा' चा हाच शेवटचा रोख होता.

कितीही शांततामय चळवळ असली, तरी परकीय सत्ता हे उघड कसे करू देईल? ते गनिमी काव्यानेच केले-साधले पाहिजे. उघडच एका बाजूने सरकारी कचेरीवर मोर्चे जाऊन काँग्रेसचे झेंडे लावण्याचा प्रयत्न झाला अन् दुसऱ्या बाजूने गावोगावचा कारभार लोकांचा, लोकांनी पाहावा म्हणून संघटना होऊ लागली. ही दुसरी म्हणजेच प्रतिसरकारची स्थापना. ती करावयास देशसेवकांना 'भूमिगत' व्हावे लागले. औरंगजेबाला तोंड देताना राजाराम महाराज आणि खंडो बल्लाळ वगैरे मंडळींनी जे केले तेच आता करावयाचे होते. सोपे का आहे हे? राखेचे तोबरे खावे लागले ना खंडो बल्लाळांना?

पण ते दिव्य करायला जी मंडळी ''गुप्ते'' झाली, भूमिगत झाली, त्यांत साने गुरुजींचा पाय पुढे! अहो, देशापायी वनवास पत्करणारांना आईच्या आपुलकीने कोणी वाट दाखवावयाची? तपस्वी जबाबदारांनीच. ती सात्त्विक देशसेवा साने गुरुजींनी केली, पण ले वर्षभराने पकडले

गेले. १९४५ पर्यंत ते इंग्रजांच्या तुरुंगात होते. तेथे 'एकच दे चिनगारी' हा अभंग-पद्य गाऊन ते तरुणांचा रसरशीतपणा सतेज ठेवीत. तुरुंगातून सुटल्यावर तर सगळा महाराष्ट्र त्यांनी क्रांतिकीर्तनांनी दुमदुमवून सोडला. चले जावच्या चळवळीत जे अभिमन्यू, विश्वासराव, दौलतराव, सदाशिवराव, अप्पा बळवंत, बाजी प्रभू धारातीर्थी पडले होते त्यांचे भावपूर्ण पोवाडे साने गुरुजी सगळीकडे गात सुटले. नंदूरबारचा कोवळा शिरीषकुमार, माथेरानचा, 'वागघ पण वागघ' कोतवाल, नवग्रहांसारख्या नऊ गोळ्यांच्या तडाख्यात सापडलेला वडूजचा परशुराम पैलवान, तो भगवान भुसारी, ते वसंत दाते नि कमलाकर, दांडेकर, फासावर चढलेला कराचीचा हेमू कलाणी, रानात-वनवासात टायफॉईडने गेलेला सातारचा आयुर्वेद-विद्यार्थी पेंढारकर, नागपूरचा धैर्यधर विष्णू या हुतात्म्यांची संकीर्तने आपल्या रसाळ वाणीने करून साने गुरुजींनी वीस-वीस हजार लोकांच्या सभांतून अश्रूंच्या भागीरथी वाहविल्या, इंग्रज गेलाच पाहिजे या निश्चयावर जनमनाचा झेंडा कणखरपणे उभा केला आणि 'चलो दिल्ली' म्हणून सुभाषचंद्र ससैन्य हिंदुस्थानात येणार होते, पण दैव आडवे आले म्हणून निराश झालेल्या भारतीयांमध्ये 'हिंमत मर्दा तो मदत खुदा' असा आत्मविश्वास रुजविला.

साने गुरुजींच्या या 'काशीयात्रेचे मावंदे' सिद्धगडावर १९४३ च्या जानेवारीत झाले, सकाळी कर्जत परिसरातील मंडळी नि साने गुरुजी भाई कोतवालाचा बळी जेथे इंग्रजांनी घेतला होता तेथे जमा झाले. कोतवालांच्या समाधीजवळ नीरांजने पाजळली. त्यांच्या सत्त्वधीर प्रकाशात साने गुरुजींनी काँग्रेसचा तिरंगी झेंडा उभारला. कोतवालांचे आईबाप व गृहलक्ष्मीही त्या कृतज्ञतांजलीसाठी आली होती. साने गुरुजींनी आपले डोके समाधीवर ठेवून अश्रूंचा अभिषेक केला. त्या वेळी भाई कोतवालांचा सुपुत्र भारत पुढे झाला अन् त्याने साने गुरुजींच्या पायांना मिठी मारली. मग शांत सुरांनी सर्वांनी प्रार्थना म्हटली. आतापर्यंत भिरभिरणारा वाराही त्या प्रार्थनेला शांतिसुरांनी साथ देऊ लागला. एवढ्यात अरुणप्रभा फाकली, पूर्व क्षितिजाच्या त्या तांबूस गुलाबी तेजाने नवनवीन आशांचे किरण चमकू लागले, साने गुरुजी उद्गारले, "वीर कोतवाल अमर रहे! स्वातंत्र्यदेवी की जय!"

□□

## १७. स्वतंत्र भारत असा हवा

सन १९४६ ची अखेर होत आली. पुण्यास कुमारांचे चौथे साहित्य संमेलन होते. त्याचे अध्यक्ष साने गुरुजींना करावे अन् अशा रीतीने त्यांचा सत्तेचाळिसाव्या वाढदिवशी कृतज्ञ गौरव करावा, म्हणून मंडळींनी बेत केला. साने गुरुजींना असले सत्कार आवडत नसत. अशांना ते चाळे समजत, पण मग वीरेंद्र अढिया पुढे झाले. ते साने गुरुजींचे प्रेमळ चाहते. त्यांनी आर्जवे केली. तरीही साने नकार देतच होते. मग पांडुरंगाच्या दारी नामदेवसंत धरणे धरून बसले होते ना, तसे अढिया बसले. ते म्हणाले, "गुरुजी, आपण अध्यक्ष होत नसला तर कुमार-संमेलनच बंद!" मुलांचा का उत्साह साने गुरुजी मावळू देणार? पांडुरंग पावला. साने गुरुजी अध्यक्ष झाले. त्यांनी २४ डिसेंबर १९४६ रोजी अध्यक्षपदावरून सांगितले की, "कुमारांनो, उद्याचा भविष्यकाळ तुमचा आहे. तुम्हाला तरी उज्ज्वल अन् मंगल भविष्य दिसो. भारतात सारे गुण्यागोविंदाने नांदत आहेत, द्वेष शमले आहेत, परस्परांची संस्कृती अभ्यासित आहेत, अनेक भाषा शिकत आहेत, विकास करून घेत आहेत, ज्ञानविज्ञान वाढत आहे, कला फुलत आहेत, सर्व जनता त्यांच्या संवर्धनात सामील होत आहे, व्यक्तिस्वातंत्र्याचीही मर्यादित प्रतिष्ठा ठेवणारा समाजवाद आला आहे, वर्ग एक झाले आहेत, स्पृश्यास्पृश्ये इतिहासात जमा झाली आहेत. प्रगतीसाठी राष्ट्र आवश्यक गरजा भागवून अनंत हात पसरून पुढे जात आहे, अज्ञान-रुढी-रोग नष्ट होत आहेत, प्रयोग चालले आहेत, हिमालयावर तरुण चढत आहेत, आकाशात उडत आहेत, ताऱ्यांवर जाऊ पाहताहेत, सागराच्या तळाशी ज्ञानासाठी डुब्या घेत आहेत, ज्ञानासाठीच नचिकेताप्रमाणे मृत्यूशी स्नेह करीत आहेत, असा हा भारत विज्ञानवादी नि ध्येयवादी तुमच्या डोळ्यांसमोर उभा राहू दे, भारत भाग्यविधाते नमोनमः।"

□□

# १८. पांडुरंगी जेणे घडे अंतराय

स्वराज्य आले पण समता कोठे आली? ती आली नाही, तर स्वराज्य हे रामराज्य कसे बनायचे? १९४७ साली जळगाव येथे सभा झाली. संत विनोबाजी भावे यांनी विचारले, ''अस्पृश्यता गेली का? ती घालविण्यासाठी गेल्या बारा वर्षांत केलेल्या सेवाव्रताचा झाडा द्या.'' साने गुरुजींनी भर सभेत मान खाली घातली. त्यांचा आतला आवाज उमटला– ''प्रायोपवेशन!''

साने गुरुजींनी प्राण पणाला लावू नयेत. ते त्यांच्या खासगी मालकीचे आहेत कोठे? ते सार्वजनिक झाले होते. तेव्हा एस. एम. जोशी, रावसाहेब पटवर्धन अन् विशेषतः सेनापती बापट म्हणाले, ''साने गुरुजी, अशा आततांईने कार्य साधणार नाही. अस्पृश्यता गेल्याशिवाय स्वराज्य खरे नाही असे महात्मा गांधी म्हणत. त्यासाठी त्यांनी उपास केले, पण अस्पृश्यता गेली नाही अन् स्वराज्य तर आले! तेव्हा आपण यत्नदेवाची कास धरू महाराष्ट्राची काशी जे पंढरपूर, तेथील विठ्ठलमंदिर अस्पृश्यांसह सर्वांना खुले करू.''

भंगीकाम व्रत म्हणून करणारे होते सेनापती पांडुरंग महादेव बापट. त्यांचा शब्द मानला पांडुरंग सदाशिव साने गुरुजींनी. मंदिरप्रवेशाच्या प्रचाराचा दौरा मुंबईपासून सुरू केला. तेथे ना. गणपतराव तपासे यांनी पहिले अध्यक्ष होऊन प्रचाराचा नारळ फोडला. अद्वैताची कावड घेऊन संतांचा मार्ग साने गुरुजी चोखाळू लागले. कुलाबा, पुणे जिल्ह्यांतून सेनापती आणि गुरुजी असे दोनही पांडुरंग प्रचारासाठी फिरले. सभा गाजल्या. लोकांनी सत्कार केला. काही काही ठिकाणी अस्पृश्यांसाठी मंदिरे खुली झाली. साने गुरुजींचा दौरा पंढरपुरास आला. चंद्रभागेच्या वाळवंटी अफाट सभा झाली. अध्यक्षस्थानी सेनापती बापट होते. प्रास्ताविकात ते म्हणाले– ''मी बोलत नाही. मला करणे आवडते. भंगीकाम मी करतो कारण 'सर्व भेदाभेद अमंगळ' झाडले गेले पाहिजेत. समानता हा धर्माचा प्राण आहे. पशुपक्ष्यांकडे समानतेने बघावयाचे, मग माणसे का दूर ठेवायची?'' मग मुख्य वक्ते साने गुरुजी उभे राहिले.

त्यांनी प्रथम भरून आलेले डोळे पुसले. पांडुरंगाच्या पंढरीत तेव्हापासूनच करुणरसाची गंगा चंद्रभागेला मिळावयास आली. साने गुरुजी म्हणाले,

"अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरचा कलंक आहे. तो काढून टाकावा म्हणून लोकहितवादींनी, आगरकरांनी जीव तोडून सांगितले. महात्मा फुल्यांनी प्रथम हौदावर हरिजनाला पाणी भरून दिले. परमेश्वर अस्पृश्यता मानीत असेल तर मी त्याला परमेश्वरच मानीत नाही असे लोकमान्य गरजले. सयाजीराव गायकवाड सरकारांनी अस्पृश्यांतून डॉ. आंबेडकरांसारखा पट्टीचा विद्वान निर्माण केला. महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यांसाठी छात्रालये काढली. अन् 'अन्न हे पूर्ण ब्रह्म' अस्पृश्याकडे घेतले. प्राध्यापक बापूसाहेब माटे यांनी अस्पृश्यांना शहाणे करण्याकरता रात्रशाळा काढल्या. कर्मवीर भाऊराव पाटलांनी हरिजनांना उच्च शिक्षण दिले. वीर सावकारांनी पतितपावन-मंदिरच उभारले. श्रद्धानंद स्वामींनी हरिजनांकरता काय करायचे ठेवले? महात्मा गांधींनी तर अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेऊन १९३२ साली त्यांच्यासाठी प्राणांतिक उपास मांडले. दिल्लीला हरिजन पुढारी जोगेंद्र मंडल हिंदू धर्म सोडून जाण्याची भाषा बोलताच, मौलवी अन् मिशनरी त्यांना कवटाळायला धावले. हिंदू धर्माची ही विटंबना मला नाही सहन होत! तुम्हा कुणालाच होऊ नये! चंद्रभागेच्या तटी लहानथोर अन् स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव संतांनी उरू दिला नाही, पण तो अजून पांडुरंग-मंदिरात आहे तो काढून टाकण्यासाठी मी मरायला सिद्ध आहे. अडीच हजार वर्षांच्या या मंदिरातच जगद्गुरू शंकराचार्य दर्शनाला आले होते. तेथे संतांनी आपले म्हटलेले, रंजलेगांजलेले हरिजन जाऊ शकत नाहीत! ज्ञानदेव अन् नामदेव उत्तरेची यात्रा करून आले. त्यांना कळून चुकले की हिंदू धर्म उदार झाला नाही, तर तो टिकणार नाही! संतांनी वाळवंटात सर्वांना जवळ घेतले. तीच परंपरा पुढे चालवून आपण मंदिरात सर्वांना नेऊ या. भगवान श्रीकृष्णाच्या भूमीत दुःख, दैन्य आणि दास्य राहणे चांगले नाहीच. गोकुळात प्रेमाचा पाऊस पडत होता. भेदाचे वणवे कृष्णाने गिळून टाकले होते. आपल्याला रामराज्य हवे आहे ना? मग रामासारखे नको का आपण वागायला? सर्व गोपाळांच्या शिदोऱ्या एकत्र करून कृष्णाने गोपाळकाला केला, तर राम गुह कोळ्याला हृदयाशी धरी, शबरीची उष्टी बोरे खाई, जटायुपक्ष्याचे

श्राद्ध करी, वानरांना अन् अस्वलांना जवळ करी. आणि तो शिवशंकर? त्याने तर अंत्यजाचा वेष आवडीने धारण केला आहे. दत्ताजवळ गाईप्रमाणेच चार कुत्रीही आहेत. तुकाराम म्हणूनच म्हणतात की–

*जाळीन मी भेद। येथे प्रमाण तो वेद।।*
*छळील जो खळ। त्याचा धरावा विटाळ।।*

चर्चमध्ये सारे ख्रिस्ती जमतात, मशिदीत सारे मुसलमान जातात, मग मंदिरात सारे हिंदू का भावाभावासारखे येऊ नयेत? वीर सावरकर-भोपटकरांपासून सर्वांनी पंढरपूरचे मंदिर सर्वांना खुले व्हावे म्हणून सह्या दिल्या आहेत. डॉ. मुंजे तर म्हणाले की, 'मी ब्राह्मणवस्तीत हरिजनांना घरे देईन.' बंधुहो, आपण मातीची मंगल मूर्ती बनवून तिच्यात प्रभूचे सौंदर्य बघतो. वड-पिंपळ-उंबर-तुळस यांना तुम्ही नमस्कार करता आणि चैतन्यमय मानवाला का दूर लोटता? स्वामी विवेकानंद या असल्या अनुदारतेबद्दल एकदा रडले. पार्थसारथीच्या देशात ही अनुदारता पापच मानीत ते. स्वामी रामतीर्थ म्हणाले, की 'हिंदू धर्म म्हणजे शिवू–नका– धर्म काय?' संत तुकडोजी म्हणाले, की 'हरिजनांना विठ्ठलमंदिर उघडेपर्यंत मी मंदिरात जाणार नाही.' चोखामेळा विठ्ठलदर्शनासाठी तळमळला आणि आपल्या गळा विठ्ठलाने तुळशीमाळा घातल्याचे त्याला स्वप्न पडले. ते तो सांगत सुटला. बडव्यांनी त्याला बडवले. तेव्हा कुठे गेली होती अस्पृश्यता? तेव्हा चोखोबा म्हणाले– 'चोखा डोंगा परी भाव नाही डोंगा। काय भुललासी वरलिया सोंगा?।।'

पंढरपूरच्या कार्तिकीला पंधरा हजार अस्पृश्य वारकरी येतात. ते मद्यमांसास शिवत नाहीत. गळ्यात तुळशीची माळ घालतात. त्यांच्या मुलींची नावे एकादशी, तुळशी, गीता अशी असतात. अशा निष्ठावंतांना मंदिरात प्रवेश नाही? चोखामेळ्याची पायरी झाली. आता देवदर्शन नको? लिनालिथगोला अहमदाबादच्या एका प्रख्यात मंदिरात चांदीच्या चौरंगावर बसवता अन् आपल्याच बांधवांना अस्पृश्य मानून देवालाही भेटू देत नाही? वेदान्त आणि जीवन यांची आम्ही फारकत केली म्हणून विवेकानंद म्हणाले की, 'हिंदू धर्मासारखा उदार धर्म नाही अन् हिंदूंसारखे अनुदार लोक नाहीत!' कबीर म्हणाला– 'घर घर पर वाचत पोथी। नजर न आवे आत्मज्योति।।' तेव्हा आम्हा हिंदूच्या मनोरचनेत फरक व्हावा

म्हणून मी उपवासास बसणार आहे. धीर माझ्या मना। नाही आता नारायणा।। अस्पृश्यता नष्ट होईल, नाही तर? मी तरी!

*सकलांचे पाया माझे दंडवत।*
*आपुलाले चित्त शुद्ध करा।।*

नूतन स्वातंत्र्याचे, नवीन युगाचे स्वागत करायला निर्मळ आणि सतेज असा भारत उभा राहो. मला अशा आहे की पंढरपूर मोकळे होईल आणि महामंदिरातील विठ्ठल अस्पृश्यांसुद्धा सर्व हिंदूंना भेटेल. जय हिंद.''

भाषण चालू असता गुरुजींची भावगंगा त्यांच्या डोळ्यांतून उचंबळून येत होती आणि सभेतील प्रत्येकाच्या हृदयाचा कोपरा नि कोपरा भिजवून टाकीत होती, पण ज्यांच्या हाती विठ्ठलमंदिराची किल्ली, त्यांची अंतःकरणे 'कोरडा पाषाणच' राहिली. तेव्हा साने गुरुजींनी चंद्रभागेचे स्नान केले, गंध लावले, कटीवर हात ठेवून स्वस्थ उभा राहिलेल्या विठ्ठलाचे स्मरण-वंदन केले आणि तनपुरे महाराजांच्या मठात त्यांनी– १ मे रोजी उपवासाची बैठक घातली.

□□

## १९. उपवासाचे तप सफल झाले

साने गुरुजी उपासाला बसले. 'निश्चयाचा महामेरु। बहुत जनासी आधारू' वाटला. मधू लिमये त्यांच्या शेजारी सारखे बसून होते. ''उभा वाट पाहे। तोही सेविताहे।।'' (The also serve who stand and wait)

दिवस उगवे आणि मावळे. एक-दोन म्हणता म्हणता 'घटका गेली, पळे गेली, तास वाजे झणाणा! दिवस गेला, रात्र गेली, आठवडा हो उताणा।।' मग गुरुजींची प्रकृती क्षीण झाली. डॉ॰ व्होरा आले, डॉ. भडकमकर आले. त्यांनी गुरुजींना तपासले. गुरुजी शांत होते; डॉक्टर चिंता करीत होते. लोक चिंतन करीत होते. 'मंदिर हरिजनांना खुले' या पत्रकावर सह्या होत होत्या, पण विठ्ठलाचे सेवेकरी, बडवे, ते या सर्वांची कदर करीत नव्हते. एवढ्यात खानदेशचे हरिजनसेवक काकासाहेब बर्वे आले. त्यांनी विठ्ठलाला बंदिस्त ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्यापुढे




नाकदुऱ्या काढल्या. परिणाम काय झाला? बडव्यांनी ते पत्रक घेतले. त्याच्यावर सह्या केल्या म्हणता काय? गुरुजींच्या सत्याग्रहापेक्षा, प्राणापेक्षा, माणुसकीपेक्षा, वहिवाटीचे मिरासदार आपल्याला काय म्हणतील, या निंदेलाच ते भीत होते. त्यांनी टाकले ते पत्रक फाडून! आणि केले चंद्रभागेत स्नान!

तरुण संतापले. संत प्रज्वलित होऊ लागले, पण तनपुरे मठातील भगवान (विठ्ठल) आणि जनताजनार्दन कमरेवर हात ठेवूनच उभे होते. सायंकाळी सहजानंद प्रार्थना चालवीत. लोक येत, ऐकत, देवाचे नि साने गुरुजींसह संताचे दर्शन घेऊन जात. त्यांत मुले असत तसेच हरिजन असत. एकदा पंढरीत तीन वर्षे राहिलेला आंधळा हरिजन भिकारी आला अन् साने गुरुजींच्या पायी डोके ठेवून गेला. म्हणाला, ''देवाचे शिखर हरिजन पाहतात; माझ्यासारखे आंधळे देवळाच्या दगडाला नमस्कार घालतात; आता या पांडुरंगामुळे आम्हाला स्वतः पांडुरंग भेटेल. भेटेल बरे! भेटेल!''

भेटभाऊंना गुरुजींचे नमस्कार चाललेच होते. त्यात या आशीर्वाद

देणाऱ्या आंधळ्याला तर कृतज्ञतेने डोळे भरून आले! पोरेसोरेही म्हणू लागली– "श्याने गुरुजी करे पुकार। खोलो विठ्ठलमंदिर दार।।" साने गुरुजींचा उपास महात्मा गांधींपर्यंत पोहोचला. ते हळहळले. त्यांनी साने गुरुजींना सहानुभूती दाखविली, पण पंढरपुरी? एक भित्तिपत्रक चमकले– "जाओ साने सीमा पार। नहीं खुलेगा विठ्ठलद्वार।" मग मात्र ते भित्तिपत्रक कोणीतरी फाडले; मुस्लिम माताही तनपुरे मठात येऊन गुरुजींना आशीर्वाद देऊन गेल्या की, "अल्लाह तुम्हारा भला करेगा।"

ता. १० मे उगवली. मंगल पांडेने सत्तावनचे स्वातंत्र्यसमर सुरू केलेला तो मंगल दिवस. दादासाहेब मावळंकर, अप्पासाहेब पंत, ठक्करबाप्पा आले. त्यांची बैठक झाली. त्यांनी बडवे समितीशी चर्चा केली. 'वादे वादे कंठशोष' झाला नाही; शेवटी तत्त्वबोध निघाला. पंढरपूरचा विठोबा हरिजनांसह सर्वांना खुला झाला. साने गुरुजींमधला पांडुरंग मंदिरातील पांडुरंगाला कडकडून भेटला. जिवाशिवांची मिळणी झाली. नामदेवाशी देव बोलले होते, त्या आनंदाची उजळणी झाली; हरिजनाला श्राद्धीय अन्न जेवू घालणाऱ्या एकनाथांच्या समभावाची समई समाजात तेज फाकवू लागली.

□□

## २०. जीवनाचा सुवर्णमहोत्सव

सन १९४९ ची २४ डिसेंबर ही साने गुरुजींची एक्कावन्नावी जयंती. ती मुंबईत साजरी करण्याची तयारी गुरुजींच्या चाहत्यांनी केली. सेनापती बापटांना शिवाजी पार्कवरील जाहीर सभेचे अध्यक्षस्थान देण्याचे मुक्रर झाले. इतक्यात मुंबई सरकारचे एक जाहीर फर्मान सुटले. विद्यार्थी व शिक्षक यांनी स्वयंसेवक-संघटनांत भाग घ्यावयास सरकारने बंदी घातली. नागरिक स्वातंत्र्यावर पडणारा हा स्वराज्यसरकारचा घाला होता. कोण स्वाभिमानी नागरिक तो सहन करील? त्यातून साने गुरुजी? त्यांनी जाहीरच करून टाकले की २४ डिसेंबरपासून त्या फर्मानाच्या निषेधार्थ आपण उपवासास बसणार! अन् लोक करणार म्हणत होते त्यांचा जाहीर सत्कार एक्कावन्नाव्या वाढदिवसानिमित्त. साने

गुरुजींनी आपल्या जीवनाचा सुवर्णमहोत्सव नागरिक स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ प्राण पणाला लावून साजरा करण्याचे ठरविले.

लोक चिंतेत पडले. सरकार पेचात पडले. काळ हसत होता. देशभक्ती सत्त्वपरीक्षा देत होती. शेवटी सरकारला बुद्धी सुचली. त्याने आपले फर्मान २२ डिसेंबर १९४९ रोजी मागे घेतले आणि मग ठरल्याप्रमाणे साने गुरुजींचा एक्कावन्नावा वाढदिवस लोकांनी ठरविल्याप्रमाणे साजरा केला.

□□

## २१. "सहज खुंटले बोलणे!"

स्वातंत्र्य आले आणि स्वास्थ्य गेले! तर राष्ट्र उन्नतीला चढावयाचे कसे? भारत उन्नतीला चढू नये ही तर त्याच्या हितशत्रूंची मनीषा. ती पुरी करण्यासाठीच स्वराज्य येताच पन्नास लक्ष निर्वासितांचा यक्षप्रश्न त्यांनी भारतापुढे उभा केला. किंकाळ्या फोडणाऱ्या त्या रंजल्यागांजलेल्यांना आपुले म्हणणारे, त्यांचे अश्रू पुसणारे, त्यांना बोट धरून वाट दाखविणारे महात्मा गांधीही देवाघरी गेले. तेव्हापासून कोण्या पक्षाचा कार्यक्रम त्याबाबत काही करू शकले का, याचा अभ्यास साने गुरुजींनी केला. थेंबे थेंबे तळे साचे, तसे सामूहिक सहकार-समन्वयाने राष्ट्रात काही घडू शकेल का? याचा विचार करून समाजवाद हाच एक तोडगा, असे गुरुजींचे मत झाले. मग ते हा उपाय सांगावयास महाराष्ट्रात व कर्नाटकात हिंडले. २ जून १९५० रोजी कर्नाटकाचा दौरा पुरा करून गुरुजी मुंबईस आले.

गुरुजींच्या घशाच्या चिंधड्या झाल्या होत्या. स्नायू नि स्नायू पिंजला होता. रक्तदाब वाढू लागला. ८ तारखेला 'साधना' साप्ताहिकाचा सर्व मजकूर सुधेच्या पत्रासह त्यांनी लिहून दिला. त्याच वेळी त्यांच्या हृदयातून परमेश्वराची हाक त्यांना येऊ लागली होती.

म्हणून ९ जून १९५० रोजी सकाळी गुरुजी लवकर उठले. करंडीतील आंबे काढून त्यांनी आपल्या मित्राबरोबर खाल्ले; मग गेले बाजारात अन् दुपारला एक कोरे धोतर घेऊन आले. स्वतःच्या हाताने दाढी केली.

आंघोळ झाली, नवे कपडे त्यांनी घातले. भावाला आशीर्वाद लिहून ठेवला. कोणा एका मुलाचे हस्तलिखित आपल्या हातून फाटले होते म्हणून त्यास क्षमायाचनेचे पत्र लिहून ठेवले. 'साधना' साप्ताहिकाला रावसाहेब पटवर्धनांनी सांभाळावे, असे इच्छापत्र केले, संत विनोबांच्या पदकमलाला दंडवत घातले. आणि मधू लिमये याला लिहून ठेवले की "मधू, मला देवाघरचे बोलावणे आले आहे. माझ्या डोक्यात असह्य वेदना होत आहेत. मी आता झोपेच्या गोळ्या घेत आहे. मला कदाचित चिरनिद्रा लागेल. मग तुमची जबाबदारी एवढीच की लोकशाही समाजवादाची पताका व मानवतेची मान सदैव उंचच उंच ठेवायची!"

आणि त्यांना आगरकरांचे उदाहरण आठवले. गुरुजींनी मग 'प्रेतदहनार्थ' लागणाऱ्या पैशांची पुरचुंडी बांधून ठेवली. मग घेतल्या त्यांनी झोपेच्या गोळ्या! आणि पडले जाऊन अंथरुणावर! सायंकाळी झाली. सूर्यप्रकाशासारखाच गुरुजींच्या जीवनज्योतीचा प्रकाशही मंद-मंद-मंद होत चालला होता, मधू लिमये, नानासाहेब गोरे तेथे आले तो काय? 'यमपाश गळ्यासी खास लागला' असे त्यांना दिसले. मग उपाय काय? त्यांनी डॉक्टरांना बोलावले. डॉक्टर काहीच बोलेनात. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे गुरुजींना मग के. ई. एम. हॉस्पिटलात नेण्यात आले.

□□

## २२. साने गुरुजी अमर रहे!

जूनची १० तारीख! साने गुरुजी आजारी पडल्याचे सगळ्या दुनियेला कळले. दिवसभर ते आलेच कोठे भानावर? संध्याकाळी थोडेसे आले. प्रांतीय, पंथीय, जातीय, वर्गीय, राष्ट्रीय आणि धार्मिक भेदाभेदांच्या बुजबुजाटाने गुरुजी व्याकुळले होते. वैतागले होते, जिकीरले होते. तुकारामाप्रमाणे ते म्हणाले– "येणे दुःखे माझा फुटो पाहे प्राण।।" स्वातंत्र्यानंतर राष्ट्र अन्नान्नदशेला लागले. पंजाबमध्ये पंचमहानद तीर्थासारखे असता, मानवी रक्ताचा सहावा नद वाहावा ना? 'न देखवे डोळा ऐसा हा आकान्त। परपीडे चित्त दुःखी होते।।'

अशाच आवेगांनी शनिवारची रात्र विव्हळत होती. ११ जूनला

पहाटे चार वाजण्याची वेळ! हरिदिनी लागली होती. पाचच मिनिटांत पांडुरंग सदाशिव साने 'स्थिर चर व्यापुनि दशांगुळे उरलेल्या' पांडुरंगात प्राणपणाने विलीन होऊन सदा-शिव झाले! सान होऊनच सदैव राहिलेले संतहृदय साने कुळाला सार्थ करून गेले!

अंगात स्वच्छ खादीचे कपडे असलेला, कपाळाला कुंकुमतिलक लावलेला, गळ्यात फुलांचा हार घातलेला, मिटल्या डोळ्यांचा, शांत आणि निरागस मुद्रेचा साने गुरुजींचा देह मग के. ई. एम. हॉस्पिटलच्या व्हरांड्यात आरामखुर्चीवर जगाला बजावीत होता–

*"मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।*
*अकस्मात तोही पुढे जात आहे।।*
*घडीने घडी सार्थकाची करावी।*
*तनू त्यागिता कीर्ति मागे उरावी।।"*

शोकगंगा सर्वत्र खदखदू लागली! तरुणांची अंतःकरणे पिळवटली! एका ट्रकवरून गुरुजींची स्मशानयात्रा निघाली, ती गुरुजींच्या उजव्या पायाशी क्रांतिकारकांचे भीष्माचार्य सेनापती बापट कष्टी होऊन बसल्यावर! ट्रकच्या पुढे राष्ट्रसेवादलाचे शेकडो स्त्री-पुरुष, सैनिक शिस्तीने 'रामधून' म्हणीत जाऊ लागले. हॉस्पिटलपासून लालबागेच्या रोखाने यात्रा जात असता दर्शनेच्छू जनतेचा सागरच उचंबळू लागला, चिंचपोकळीवरून यात्रा आर्थर रोडवरील 'साधना'कचेरीजवळ आली, 'निरोप घेते इथे साधना, टाकुनि जाते माता।।' असा ध्वनी वातावरण देऊ लागले. साधनेच्या अंकांनी, पुष्पहारांनी गुरुजींच्या चरणी लोळण घेतली. 'रस्ते भिजले जनताश्रूंनी' सहजच ते होते. आठ मैलांची ती यात्रा झाली. ठिकठिकाणी गुरुजीमूर्तीला निरांजने ओवाळण्यात आली. राष्ट्रसेवादलाच्या कचेरीजवळ मानवंदना झाली! यात्रा प्रभादेवी, भवानीशंकर, रानडे रोडवरून मग शिवाजी पार्कच्या स्मशानभूमीत आली. हॉस्पिटलमधून ती यात्रा पावणेपाचला निघाली होती; दहा वाजता ठिकाणावर आली. तेथे अगोदरच लोकगंगा लोटली होती व रामनामाचा गजर करीत राहिली होती. यात्रा येऊन पाहोचताच सगळ्या लोकांचे 'अवयव सगळे नयनी जमले।' साने गुरुजींच्या पार्थिव देहाला सर्वांनी मनोमन कृतज्ञतेचा आसवाभिषेक केला. तोपर्यंत अग्निदेवाच्या ज्वालांनी प्रदक्षिणा घालण्यास

सुरुवात केली सुद्धा! महाराष्ट्रचारित्र्याची शिवशक्ती त्या ज्वालांच्या वलयांत विलीन होऊ लागली! तिला सेनापती बापट, आचार्य अत्रे, आचार्य भागवत, एस. एम. जोशी, रावसाहेब पटवर्धन त्या शिवशक्तीला अभिवंदना देऊन म्हणाले "साने गुरुजी अमर रहे।"

□□



# साने गुरुजींचे जन्मटिपण

१८९९ डिसेंबर २४ जन्म.
१९१८ मॅट्रिक.
१९२४ एम. ए. पास, ना. गोखले चरित्र लिहिले, अमळनेर हायस्कुलात शिक्षक.
१९२८ "विद्यार्थी" हे साने सरांचे मासिक खेड्याखेड्यात गेले.
१९३० म. गांधींच्या चळवळीत; प्रांत-भारतीचा पुकार.
१९३२ धुळे तुरुंगात संत विनोबाजींची "गीताहृदय" व्याख्याने टिपली.
१९३६ फैजपूरचे काँग्रेस अधिवेशन फत्ते केले.
१९४१ काँग्रेस सेवादलाची संघटनेचा प्रचारकरताना अटक व दीड वर्षांची शिक्षा.
१९४२ 'चले जाव' चळवळीत 'भूमिगत' झाले व पुढे शिक्षाही भोगली.
१९४६ हुतात्म्यांस वंदन व 'भूमिगतांचा' परामर्श; पुण्यास कुमार संमेलनाचे अध्यक्ष.
१९४७ अस्पृश्यता निवारण प्रचार. एकवीस दिवसांच्या उपोषणाने पंढरपूर येथील मंदिर हरिजनांस खुले. ऑगस्ट पंधराला 'साधना' साप्ताहिक.
१९४९ मुंबईस ५० वा वाढदिवस साजरा.
१९५० कर्नाटकच्या दौऱ्यानंतर ९ जून रोजी निश्चयपूर्वक निर्वाण.

□ □

# भले भले हे साने गुरुजी

पु. पां. गोखले

जो परोपकार करीतचि गेला ।

पाहिजे तो ज्याला त्याला ।।

जो दुसऱ्यांना जवळ करीत जातो, तो सर्वांनाच हवाहवासा होतो. तसेच होते साने गुरुजी. लोकांचे, समाजाचे, देशाचे ज्यात भले आहे ते करीत रहावयाचे असे साने गुरुजींचे मत होते. त्यांचे मन आकाशासारखे मोठे होते. समाजात वावरताना वादळे येणार, विजा कडकडणार, निंदा धुळवडीसारखी होणार, पण मनाचा तोल न सोडता, आकाशासारखे उंचच उंच मन राखावे अणि आपले कर्तव्य करीत रहावे, अशी आहे साने गुरुजींची शिकवण. त्यांच्या गोष्टी वाचा की तोच ठसा तुमच्या मनावर उमटेल.